RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multi-Disciplinary E-Journal

# निवडणूक आयोगाची भूमिका

**डॉ. मंगेश अशोकराव रणदिवे**
सहा. प्राध्यापक (राज्यशास्त्र विभाग)
सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर
mangeshrandive44@gmail.com

---

**सारांश**

एक संविधानिक संस्था म्हणून निवडणूक आयोगाकडे पाहिले जाते. लोकशाहीच्या यशस्वीतेकरिता ज्या संविधानिक संस्थाची व बाबीची गरज असते त्यातील निर्वाचन आयोग ही महत्त्वपूर्ण व तेवढीच नि:पक्ष अशी संस्था आहे. लोकशाही राज्याचा राज्यकारभार चालविण्याकरिता ज्या निवडक प्रतिनिधींची आवश्यकता असते त्या प्रतिनिधींची निवडणूक घेण्याची संपूर्ण जबाबदारी ही निवडणूक आयोगाला पार पाडावी लागते. निवडणुकांची सुनिश्चिती, राजकीय पक्षाला मान्यता, आदर्श आचार संहितेची घोषणा व एकूणच निवडणुकांचे सूरळीतपणे संचालन करण्याची भूमिका निवडणूक आयोगाने संविधानिक तरतुदी व संसदेने नियमित केल्या तरतूदीच्या अधिन राहुन अगदी चोखपणे बजावली आहे. यातच बदलल्या परिस्थितीनुसार निवडणूकांमध्ये या आयोगाने नव–नवीन तंत्रज्ञानाचा केलेला स्वीकार व त्यांची अमंलबजावणी ही विशेष उल्लेखनीय बाब आहे.

**बीज शब्द**

निवडणूक आयोग, लोकशाही, राजकीय पक्ष, संविधानिक संस्था, तटस्थता, आचारसंहिता, इलेक्ट्रॉनीक मतदान यंत्र, निवडणूक खर्च, निवडणूक आयुक्त, निवडणूक चिन्ह, मूलभूत संरचना, मतदान केंद्र, बॅलेट पेपर, नौकरशाही.

## प्रस्तावना

विविधतेने नटलेल्या व खंडप्राय असलेल्या भारत देशाने स्वातंत्र्यानंतर लोकशाही शासन पद्धतीचा विचारपूर्वक स्वीकार केला. भारतातील सर्व भाषिक गटांना, जाती – जमातींना, सर्व धर्मीयांना, वर्गीय गटांना प्रतिनिधीत्व मिळावे व त्या प्रतिनिधी मार्फत त्यांचे प्रश्न शासनापर्यंत पोहचावेत आणि सोडविले जावेत हा प्रमुख हेतु त्यामागे होता. प्रतिनिधीत्वाची निवड करीत असतांना लोकशाहीत निवडणूक प्रक्रिया महत्त्वाची ठरत असते. लोकशाही शासन पद्धतीच्या अनेक वैशिष्ट्यांपैकी एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे विशिष्ट कालावधीत पार पडणाऱ्या निवडणुका होय. स्वतंत्र आणि नि:पक्ष निवडणुका हे लोकशाहीच्या यशस्वीतेचे एक लक्षण ठरते. लोकशाहीमध्ये निवडणुकीच्या माध्यमातूनच राजकीय पक्षांना राजकीय सत्ता हस्तगत करता येते. त्यामुळे प्रत्येक राजकीय पक्षाला निवडणुकीच्या मांडवाखालुन जावेच लागते.

## निवडणूक आयोग : संविधानिक संस्था

भारतामध्ये निवडणुकांची सर्व व्यवस्था निवडणूक आयोगाकडे देण्यात आलेली आहे. नवस्वतंत्र भारतातील सर्व निवडणुका या नि:पक्षपातीपणे आयोजित केल्या जाव्यात व त्या मुक्त वातावरणात व्हाव्यात या प्रमुख उद्देशाने संविधानाच्या ३२४ व्या कलमानुसार कायमस्वरूपी निवडणूक आयोगाची (Election Commission of India) स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी म्हणजेच भारतीय प्रजासत्ताक अस्तित्वात

येण्याच्या एका दिवसा अगोदर करण्यात आली. संविधान निर्मात्यांना सदोष निवडणूक यंत्रणा लोकशाहीच्या मुळावर घात करू शकते याची जाणीव होती. मतदाराला निर्भयपणे मतदान करता यावे या हेतूने संविधानात निवडणूका या शिर्षकांतर्गत एक स्वतंत्र भाग (भाग – १५) समाविष्ट करण्यात आलेला आहे.

निवडणुकांचे संचालन, नियत्रंण व निवडणुकावर देखरेख ठेवण्याकरिता संविधानाने निवडणूक आयोग निर्माण केला आहे. या निवडणूक आयोगाच्या आयुक्ताच्या नियुक्तीचे अधिकार घटनेनुसार राष्ट्रपतीकडे देण्यात आले. एकापेक्षा अधिक आयूक्त नेमण्याची घटनेत तरतूद असल्याने कलम ३२४ (२) आता एक मुख्य निर्वाचन आयुक्त आणि त्याशिवाय दोन निर्वाचन आयुक्त अशी रचना निर्माण झाली. आजमितीस देशाचे निवडणूक आयुक्त म्हणून सुनिल अरोरा आयोगाचे प्रमुख असून सुशिल चंद्रा व राजीव कुमार हे इतर निवडणूक आयुक्त म्हणून आयोगाचा कार्यभार सांभाळतात. आयोगाचे निर्णय हे बहूमताने घेण्याची तरतूद करण्यात आली आहे.

निर्वाचन आयोग एक संविधानिक संस्था असल्याने संविधानिक तरतूदी आणि संसदेने वेळोवेळी संमत केलेले कायदे यांच्या चौकटीत राहून आयोगाला कार्य करावे लागते. या संदर्भात संसदेने वेळोवेळी काही कायदे समंत केले आहेत. त्यात प्रामुख्याने जनप्रतिनिधी कायदा १९५० आणि जनप्रतिनिधी कायदा १९५१ यांचा समावेश करावा लागेल. देशाची राजधानी असलेल्या दिल्ली येथे निर्वाचन आयोगाचे स्वतंत्र सचिवालय आहे. यात जवळ–जवळ ३०० कर्मचारी आणि अधिकारी कार्यरत आहे. त्याशिवाय संचालक, मुख्य सचिव, इतर सचिव, उपसचिव, उपसंचालक हे अधिकारी असतात. कार्याचे वाटप कामाचे स्वरूप आणि प्रादेशिक विभाग या तत्त्वावर केले जाते. अशाच प्रकारची निर्वाचन संरसचना राज्यपातळीवर देखील असते. घटक राज्यासाठी देखील मुख्य निर्वाचन आयुक्त आणि इतर अधिकारी कर्मचारी असतात. निवडणुकांच्या कालावधीत इतर शासकीय अधिकारी, पोलीस यंत्रणा निवडणूक आयोगास सहकार्य करीत असते. निवडणूक कालावधीत निवडणूक आयोगास एवढे अधिकार प्राप्त होतात की आयोगाचे वर्तन अधिक प्रभावशाली बनते. संसदेचा कोणताही हस्तक्षेप या निवडणूक आयोगाच्या कामकाजात होणार नाही याचीही दक्षता घेण्यात आली आहे.

### निवडणूक आयोगाची भूमिका

भारत हा जगात सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था असणारा देश आहे. भारतात मतदारांची प्रंचड संख्या आहे. असे असूनही १९५२ पासून आजवर झालेल्या सर्व सार्वत्रिक, मुदतपूर्व व पोटनिवडणूका सुव्यवस्थित व नि:पक्षपणे पार पडल्या आहेत. निवडणूक आयोगाच्या या कार्याची जगातील अनेक देशांनी मुक्तकंठाने केलेली प्रशंसा ही बाब महत्त्वपूर्ण ठरते. आयोगाचे कामकाज काटेकोर आणि नि:पक्षपणे व तटस्थतेने कसे चालते याचा अभ्यास करण्यासाठी या देशांनी भारतातील निवडणूक आयोगाचे मार्गदर्शन घेतले आहे. थोडक्यात निवडणुका सुरळीतपणे पार पाडण्यात निवडणूक आयोगाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरत असते. निवडणूक आयोगाची भूमिका ही या आयोगाला पार पाडाव्या लागणाऱ्या कार्यावरून लक्षात येते. याविषयक आढावा पूढीलप्रमाणे घेण्यात आलेला आहे.

### निवडणुका (सार्वत्रिक) सुनिश्चित करणे

भारतीय संविधानाने आपल्याला नियमित, निर्भय व नि:पक्ष निवडणुकांची हमी दिलेली आहे. निवडणुकांचे नियोजन करतांना देशाचे हवामान कृषी क्षेत्रातील कार्य, शाळांचे परीक्षा वेळापत्रक इ. बांबीचा अभ्यास करून व त्यात कोणत्याही प्रकारची बाधा न येता मतदानाची सोय उपलब्ध करून दिल्या जाते.

ज्या भागात निवडणुकांचे आयोजन करावयाचे आहे त्या भागातील एकंदरीत परिस्थितीचा अभ्यास करूनच निवडणुकांचे नियोजन केल्या जाते.

**राजकीय पक्षाला मान्यता प्रदान करणे**

संविधानात राजकीय पक्षाला आणि व्यक्तीला निवडणूक चिन्ह प्रदान करणे हे निवडणूक आयोगाचे प्रमुख काम आहे. राजकीय पंक्षाना विशिष्ट निकषाच्या आधारावर अखिल भारतीय पक्ष तसेच राजकीय पक्ष म्हणून माण्यता प्रदान करणे ही कामे आयोगास करावी लागतात. तसेच संबधित राजकीय पक्षामध्ये निवडणूक चिन्हा विषयी तंटा निर्माण झाल्यास निर्णय देणे हे आयोगाचे कार्य आहे.

**प्रसार माध्यमे आणि निवडणूक आयोग**

प्रसार माध्यमांच्या संदर्भात निवडणूक आयोगाची निश्चित भूमिका असते. प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधीशी नियमितपणे संपर्क या आयोगाला ठेवावे लागते. अशा प्रतिनिधींना मतदान केंद्रे, मतमोजणी केंद्रे यांना भेटी देता येतात. प्रसार माध्यमांना मतदान तसेच मतमोजणी यावि  यी अहवाल सादर करण्याची परवानगी दिली जाते. निवडणूक आयोग वर्तमानपत्रे आणि इलेक्ट्रानिक्स माध्यमातूनच सांख्यीकीय माहिती व अन्य कागदपत्रे जनतेला उपलब्ध करून देत असतो.

**आदर्श आचार संहिता**

काही दिवसा अगोदरच निवडणुकीची घोषणा निवडणूक आयोगामार्फत केली जाते. त्याचवेळी उमेदवार आणि राजकीय पक्षाकरिता आदर्श आचार संहिता घोषित केल्या जाते. आचार संहिता लागूझाल्यावर त्या आचार संहितेचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही पक्षाला व उमेदवाराला निवडणूक आयोग दंड देत असते.

निवडणूक आयोगाने १९७१ च्या ५ व्या लोकसभा निवडणूकीमध्ये पहिला कोड जारी केला. यानंतर त्यात वेळोवेळी सुधारणाही करण्यात आल्या. सर्वच राजकीय पक्षांना व उमेदवारांना निवडणुकीत सहभागी होण्याची व निवडणूक जिंकण्याची संधी मिळणे गरजेचे आहे. त्यासाठी आचार संहिता म्हटल्या जाणाऱ्या नियमांचे सुनिश्चितीकरण केले जाते.

**निवडणूक खर्चावर नियंत्रण**

निवडणूक मोहिमेदरम्यान राजकीय पक्षामार्फत तसेच उमेदवाराकडुन जे पैसे खर्च केले जातात. त्यावरील रकमेची कायदेशीर मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. पैशाच्या बळावर एखादया उमेदवाराला अधिक मते प्राप्त होतील हे योग्य होणार नाही, म्हणून आयोगाने या संदर्भात अनेक सूचना केलेल्या आहेत.

**आधुनिकीकरणाचा अवलंब**

वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रगतीचा लाभ घेऊन निवडणूक प्रक्रियेत सुधारणा आणण्याचा प्रयत्न निवडणूक आयोगाने केला आहे. निवडणुकीतील गैरप्रकार कमी करणे व कार्यक्षमतेत सुधारणा करण्याच्या हेतूने आयोगाने इलेक्ट्रॉनीक मतदान यंत्राचा (EVM) केलेला वापर हा त्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरते. १९८२ मध्ये केरळ राज्यातील विधानसभा निवडणुकीत EVM चा प्रायोगिक तत्त्वावर प्रयत्न केला गेला. यशस्वी चाचणी आणि कायदेशीर चौकशी केल्यानंतर आयोगाने या EVM यंत्राचा वापर सुरू

करण्याचा निर्णय घेतला. आयोगाने २८ फेब्रुवारी १९९८ रोजी ठरावीक माहिती, व्यवस्थापन, प्रशासन आणि निवडणुकीचे झटपट परिणाम देण्यासाठी www.eci.gov.inही स्वत:ची बेबसाईट तयार केली.

१९९३ मध्ये मतदार छायाचित्र ओळखपत्र (EPIC) जारी करण्यात आले. तसेच ते २०१४ च्या निवडणूकीत अनिवार्य सुद्धा करण्यात आले. १९९८ मध्ये आयोगाने मतदार यादयांच्या संगणकीकरणासाठी एक कार्यक्रम निश्चित केला. २०१४ च्या सार्वत्रिक निवडणुकीतील आठ लोकसभा मतदार संघामध्ये मतदार सत्यापीत कागद ऑडिट (VVPAT)चा अवलंब करण्यात आलेला वापर हे निवडणूक आयोगाचे एक मोठे यश होते. याच वर्षाला निवडणुकीत उभे असलेल्या उमेदवारापैंकी एकही पसंतीचा नसल्यास त्यांना नाकारण्याचा अधिकार म्हणून EVM यंत्रावर NOTAया घटनेचा पर्याय मतदारांना उपलब्ध करून देण्यात आला. २०१५ च्या बिहार विधानसभेच्या निवडणुकीत उभे EVM मशीनवर उमेदवारांची छायाचित्रे असलेली पहिली फोटो मतदार यादी तयार करण्यात आली.

## सल्लागाराची भूमिका

निवडणुकविषयक कोणत्याही प्रकारचे वाद निर्माण झाल्यास तसेच त्यांची सोडवणूक करण्यासाठी सल्लादायी अधिकार आणि अंशत: न्यायविषयक अधिकार आयोगास आहेत. सर्वसाधारणपणे न्यायसंस्था आयोगाच्या कार्यात हस्तक्षेप करीत नाही. उत्तर प्रदेशातील पीलीभीत जिल्ह्यात ७ व ८ मार्च २००९ रोजी सभा घेऊन आक्षेपार्ह भाषण करून आचार संहिता भंग केल्याबद्दल आयोगाने वरूण गांधी आणि भारतीय जनता पार्टी यांना नोटीस बजावली. त्यावेळेचे निवडणूक आयूक्त म्हणून असलेले श्री. एन. गोपालस्वामी म्हणाचे की, ''आम्ही टेप पाहिला आणि समाधानी आहोत म्हणून आम्ही सल्ला दिला. आम्ही आमचे कर्तव्य केले आहे. आमचे कर्तव्य तिथे संपते.'' या संदर्भात अंतीम निर्णय देण्याचा अधिकार हा न्यायालयाचा असला तरी आयोगामार्फत पार पाडण्यात आलेली सल्लागारी भूमिका महत्त्वपूर्ण ठरते.

## निवडणूक खर्चावर नियंत्रण

निवडणूकीच्या काळात पैशाच्या आधारावर करण्यात येणाऱ्या व वाढत असलेल्या गैरप्रकाराला आळा घालण्यासाठी निवडणूक आयोगाने या संदर्भात अनेक सूचना व बदल केले आहेत. आयोगाने आयकर विभागाच्या आय. ए. आर. अधिकांऱ्याला सर्व निवडणूकांचा निवडणूक निरीक्षक (खर्च) म्हणून नियुक्त केले आहे. भारतीय महसूल सेवेतून खर्च पर्यवेक्षकांची नेमणूक करून निवडणूक आयोग, निवडणूक खर्चाच्या वैयक्तिक खात्यावर लक्ष ठेवते. आयोगाने उमेदवारीच्या मालमत्तेचा तपशील नामनिर्देशित पत्र सादर करतांना शपथपत्रावर दिलेला आहे. ज्यात परिणामांची घोषणा झाल्यापासून ३० दिवसाच्या आत निवडणुकीत करण्यात आलेल्या खर्चाचा तपशील उमेदवारांना देणे गरजेचे आहे.

जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचे वास्तव्य असलेल्या भारत देशात ठरावीक काळानुसार निवडणुका घेण्यात येतात. किंबहुना निवडणूका घेणे हे लोकशाही व्यवस्थेचे मूलतत्त्व आहे आणि संविधानाच्या मूलभूत संरचनेचा तो एक भाग आहे. या निवडणुका मुक्त व नि:पक्ष वातावरणात तसेच कोणाच्याही दडपणाशिवाय पार पाडुन भारतीय निवडणूक आयोगाने आपली भूमिका अत्यंत निर्भिड व चोखपणे बजावली आहे. ज्या उमेदवारांना निवडणूक लढवायची असते. असे उमेदवार आपले नामनिर्देशन पत्र निवडणूक आयोगाकडे दाखल करीत असतात. त्यानंतर उमेदवारांची एक यादी प्रसिद्ध केली जाते. निवडणूक काळात प्रचार करण्यासाठी सरकारी स्त्रोतांचा वापर करण्यास कोणत्याही पक्षाला अनुमती नसते. मतदान केंद्रांवर सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान घेण्यात येत असून साधारणत: संवेदनशील

क्षेत्रामध्ये या वेळेत आयोगाकडुन बदल करण्यात येते. प्रत्येक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मतदान केंद्रावर असतात. प्रशासनातील कर्मचारी मतदान करणाऱ्या व्यक्तीच्या डाव्या बोटाला चिन्हांकित केल्या जाते. ही मतदान केल्याची खून असते. ही प्रथा १९६२ साली सुरू झाली अशाप्रकारे निवडणूक आयोग निवडणुकीच्या घोषणेपासुन तर निवडणुकीच्या निकालापर्यंतच्या प्रत्येक पैलूंवर निर्णय घेत असते.

आजपर्यत मुख्य निवडणुक आयुक्ताचे पद भूषाविणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने आपल्या भूमिकेचे निर्वाहन अत्यंत प्रमाणिक व दक्षतेने केलेले आहे. त्यात टी. एन. शेषन यांचा उल्लेख अग्रक्रमाने करावा लागेल. दि.१२ डिसें. १९९० ला मुख्य निर्वाचन आयुक्त पदावर आरूढ होणाऱ्या टी. एन. शेषन यांच्यामुळे दिल्लीस्थित असणाऱ्या निर्वाचन आयोगाच्या अगदी सामान्य दिसणाऱ्या इमारतीला शक्तीचे स्वरूप प्राप्त झाले. या अगोदर नौकरशाही म्हणजे केवळ सत्ताधाऱ्याच्या हो मध्ये हो मिळविणे असे असतांना शेषन यांनी आपल्या इमानदारी व दंडुकशाहीच्या सुयोग्य वापराने नोकशाहीचा दुरूपयोग करणाऱ्या सत्ताधाऱ्याच्या मनात धास्ती निर्माण केली.

टी. एन. शेषन यांना कुठेही थोडी शंका निर्माण झाल्यास ते निवडणूक रद्द करीत असत. १९९० मध्ये बिहार राज्यातील विधानसभेची निवडणूक अगोदरच चार वेळा रद्द झाली असतांना व त्यातच मुक्त, नि:पक्ष व शांततेत या निवडणुका घेणे हे आवाहन असतांना हे आव्हानही त्यांनी लिलया पेलले. बिहारमध्ये मुख्यमंत्री असलेले लालु प्रसाद यादव यांना विरोधी पक्षापेक्षा शेषन यांची धास्ती अधिक होती. त्यांनीच विविध नेत्यांच्या टिकेला न जुमानता सार्वत्रिक निवडणुकीत ओळखपत्र अनिवार्य केले. यासोबतच उमेदवारांची निवडणुकीतील खर्चाची मर्यादाही निश्चित केली. आपल्या ६ वर्षाच्या कालावधीत त्यांनी निवडणूक आयोगाला एक वेगळी व स्वतंत्र ओळख प्राप्त करून दिली.

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर पार पडलेल्या विविध घटक राज्यातील विधानसभा निवडणूकीत EVMयंत्राचा गैरवापर करण्यात आला तसेच येत आहे. असा आरोप विरोधी पक्षामार्फत करण्यात आला. या राजकीय पक्षांनी EVM ऐवजी बॅलेट पेपरचा निवडणुकीत वापर करण्यात यावा अशी मागणी केली आहे. या मागणीच्या समर्थनार्थ त्यांनी विकसित देशात होणाऱ्या निवडणूकीत बॅलेट पेपरचाच वापर करण्यात येतो हा संदर्भ जोडला. त्यांचे म्हणजे असे आहे की, युके., फ्रॅान्स, जपान, तसेच सिंगापूर सारखे विकसित देश मतदाराचा विश्वास कायम ठेवण्यासाठी अजुनही बॅलेट पेपरचाच सार्वत्रिक निवडणुकीत वापर करीत आहेत. केवळ भारतातच EVM च्या वापराला प्राथमिकता दिली जाते. या संदर्भात २८ ऑगस्ट २०१८ रोजी निवडणुक आयोगाने सर्व राजकीय पक्षाची बैठक आयोजित केली होती. त्यात भारतीय जनता पक्ष वगळता उर्वरित सर्व राजकीय पक्षांनी EVM च्या वापराला विरोध दर्शविला होता. यावर निवडणूक आयोगाने घेतलेल्या भूमिकेवरून हे दिसते की, सध्यातरी बॅलेट पेपर हे EVMला पर्याय होऊ शकत नाही.

यातच एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे One Nation One Electionहा होय. देशात टप्प्याटप्प्याने होणाऱ्या निवडणुकीत लागणाऱ्या खर्चात कपात व्हावी हा मुद्दा समोर रेटत सत्तेत असणाऱ्या भाजप सरकारने संपूर्ण देशात लोकसभा व विधानसभेच्या निवडणुका एकाचवेळी घेण्यात याव्या अशी मागणी केली. मात्र निवडणूक आयोगाने आपली भूमिका स्पष्ट करतांना निवडणुकीत वापरण्यात येणाऱ्या EVM व VVPAT तसेच कुशल मनुष्यबळ यांची पाहिजे त्या प्रमाणात उपलब्धता होऊ शकणार नाही म्हणून One Nation One Electionतुर्तास शक्य नाही असे म्हटले. सध्या सत्तेत असणाऱ्या भाजप सरकारने आपल्या अधिकाधिक राज्यामध्ये एकाच वेळेला विधानसभेच्या निवडणुका घेण्यात याव्या अशी मागणी केली आहे. त्यातच हा मुद्दा निवडणूक आयोगाकडे विचाराधीन आहे.

**निष्कर्ष**

भारताचे निवडणूक आयोग एक अतिशय शक्तीशाली आणि स्वतंत्र अशी संस्था आहे आणि कोणत्याही अन्य राजकीय संस्थेस जबाबदार नाही. निवडणूक आयोग आपल्या स्थापनेपासूनच आपल्या शक्तीचा पूर्ण क्षमतेने उपयोग करत आहे आणि त्या शक्तीत वाढ सुद्धा केली आहे. भारतात सार्वत्रिक निवडणुकांचे आयोजन करणे व विशेष करून अतिसंवेदनशील भागात याप्रकारचे कार्य सिद्धीस नेणे सोपे काम नाही. देशातील सार्वत्रिक निवडणुकीच्या यशासाठी निवडणूक आयोगाने अनेक प्रयत्न केले आहेत म्हणूनच लोकशाही आणि नि:पक्षपाती निवडणुका या दोन्ही स्वरूपात निवडणूक आयोग हे पालक म्हणून ओळखले जाते.

**संदर्भ सूची**


- डॉ. साबळे, भारतीय शासन आणि राजकारण, हिमालया पब्लिशिंग हाऊस, नागपूर २००४.
- प्रा. व्ही. बी. पाटील, महाराष्ट्रातील पंचायतराज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, 'के सागर' पब्लिकेशन्स, पुणे, २००५.
- लोटे रा. ज., भारतीय शासन आणि राजकारण, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, जुन २००९.
- डॉ. फाडिया बी. एल., राजनिती विज्ञान, साहित्य भवन पब्लिकेशन्स, आग्रा.
- www.mr.m.vikipedia.org